Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-X Oct. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# घटते लिंग गुणोत्तर समाज स्थैर्यास घातक

**प्रा. गोपाळ हनुमंत बडगिरे**
सहाय्यक प्राध्यापक
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,
सिडको नांदेड

**प्रस्तावना :**

मानवी समाजात स्त्री - पुरूष हे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. निसर्गाने प्रत्येक गोष्टीवनर मर्यादा घालून दिल्या आहेत. परंतु निसर्गाने घडविलेल्या या चक्रावर मानव सतत मात करत आला आहे. समाज सातत्य व स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी स्त्री व पुरूष यांचे प्रमाण नैसर्गिकरित्या संतुलित ठेवणे आवश्यक आहे. स्त्री - पुरूषांच्या संतुलित प्रमाणामुळे समाजाची सुदृढ व निकोपवाढ होत असते. त्या सोबतच समाजाचा विकास घडून येत असतो. म्हणूनच राम मनोहर लोहिया यांनी विकास करणे या संदर्भात ''नारी के सहयोग बिना, हर बदलाव अधुरा है'' असा नारा दिला होता. म्हणजे स्त्रिच्या अस्तीत्वाशिवाय समाजाची संकल्पना अर्धवट आहे व तसेच तिच्या सहभागाशिवाय विकासाची संकल्पना ही अर्धवटच आहे. समाज व्यवस्था कायम करणे, ती टिकविणे व तिच्यात नविन परिवर्तन घडवून आणने. यासाठी स्त्रीचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे आहे.

परंतु अलीकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबरच अनेक संकल्पना बदलत आहेत व त्यामुळे नवनविन समस्या निर्माण होत आहेत. त्यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे दिवसेंदिवस कमी होत जाणारे मुलींची संख्या. स्त्री - भ्रूण हत्यांमुळे स्त्री - पुरूषांच्या प्रमाणातील वाढणारा असमतोल हा मानव समाजाला घातक असून तो समाजाला धोकादायक ठरणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार दर हजारी मुलींची संख्या शहरी भागात ९०२ आणि ग्रामीण भागात ९१९ अशी दिसून आली. यावरून लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक असला तरी स्त्रियांच्या संख्येच्या बाबतीत या क्रमांचा विचार गांभीर्याने करावयास भाग पाडतो.

समाज स्तरावर असलेलया धार्मिक - सांस्कृतिक घटकांचाही परिणाम स्त्रियांची संख्या कमी होण्यामागे कारणीभूत आहे. कुटुंबाला वंशाचा दिवा मिळावा या भूमिकेतून स्त्रिचा जन्म नाकारणे, मुलगी परक्याचे धन. हुंड्याची रक्कम वाढविणारी म्हणून तिचे ओझे वाहणे, समाज स्तरावर स्त्रिला मिळणारी वागवणूक यातून असुरक्षितता निर्माण होणे यासारख्या कारणांमुळे स्त्रिचा जन्म नाकारला जातो. स्त्री भ्रूण हत्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार यामुळे स्त्रियांच्या संख्येत व लिंगदरात असमतोल निर्माण होत आहे. हा असमतोलपणा दूर करणे, स्त्री अस्तित्वाबद्दल संवेदना जागृत करणे हे आजच्या गतीमान समाजा समोरील मोठे आव्हान आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

- लिंग गुणोत्तर प्रमाणाचा आढावा घेणे.
- असंतुलित लिंग गुणोत्तर प्रमाणामुळे समाजावर होणारे दुष्परिणाम जाणून घेणे.
- स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल राखण्याच्या दृष्टीकोणातून उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

१९८१ ते २०११ या दरम्यान समाजातून मुलींच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली. या घटत्या प्रमाणाचा व त्याचा समाजावर होणा-या दुष्परिणामांचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करून सदर शोध निबंध तयार करण्यता आला आहे. यासाठी संदर्भ पुस्तके, पुरक संदर्भ साहित्याचा व इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**स्त्री - पुरूष प्रमाण तुलना :**

नैसर्गिकरित्या स्त्री - पुरूष अशा दोन जाती निर्माण झाल्या आहेत. परंतु समाजातील पुरूष प्रधान व्यवस्थेने स्त्रीला नेहमीच गौण मानले आहे. प्रस्थापित समाज व्यवस्थेने स्त्रिला नेहमीच दुय्यम लेखले आहे. स्त्री स्वतंत्र आहे. तिला स्वतःचे मन, अस्तित्व आहे. विचार व वासना आहेत. अशा आकांक्षा आहेत हा विचार समाजाच्या ध्यानी मनी नसतो. ती एक उपभोग्य वस्तु आहे. पुरूषांना सुखावण्यासाठी सुशोभित दिसली पाहिजे. स्वतःच्या जिवनावर तिचा काही अधिकार नाही. सर्वच बाबतीत स्वतः गौणत्व पत्कारून पुरूषांच्या जीवनात फुलबाग फुलविणे हेच तिचे अंतिम ध्येय असले पाहिजे. असाच परंपरागत विचार समाजाच्या मनात खोलवर रूजलेला आहे. म्हणूनच आजही स्त्रिचे कार्यक्षेत्र हे समाजाने लादलेली चुल आणि मुल एवढ्यापुरतेच मर्यादित आहे.

निसर्गतः असलेलया मुलभूत फरकामुळेच पुरूष प्रधान समाज व्यवस्थेने हेतुपुरस्पर स्त्रिला गुलाम बनविले. दासी म्हणून तिची अवहेलना केली. त्यामुळेच ती दुय्यम व दुर्लक्षित झाली. परंतु एवढ्यावरच ही समाजव्यवस्था थांबली नाही. तर तिचे अस्तित्व नाकारण्यापर्यंत ही मजल गेली. परिणामी समाजात स्त्री भ्रूण हत्येसारख्या समस्यांचा जन्म झाला. मुलींचा जन्म नाकारणे, गर्भातच तिची हत्या घडवून आणणे हे कुकर्म समाजात राजरोसपणे घडत गेले. जन्माला घालणा-या जननीलाच मारून टाकण्याचे काम केले गेले. परिणामी स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस समाजातून कमी होत गेली. ती इतकी कमी झाली की त्यामुळे समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या. भारतात दरवर्षी पाच लाख स्त्री भ्रूण हत्या होतात असा अहवाल इंडियन मेडिकल असोशिएशनने दिला.

२०११ च्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील मुलींची संख्या ९१४ एवढी निदर्शनास आली. महाराष्ट्रात हे प्रमाण ८३३ एवढे दिसून आले. तर स्त्री भ्रूण हत्या झालेल्या महाराष्ट्रातील बीड आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे प्रमाण अनुक्रमे ८७६ व ८०१ एवढे दिसून आले. भारतात १९७६ च्या कायद्यानुसार गर्भजल परिक्षणास आणि मुलींच्या जन्माचे प्रमाण घटण्यास सुरूवात झाली. त्याचा परिणाम १९८१ च्या जनगणनेनुसार स्त्री - पुरूष प्रमाण कमी झाल्याचे निर्दशनास आले. २०११ मध्ये ही तफावत प्रचंड वेगाने वाढल्याचे दिसून आले. हरियाणा, पंजाब, राजस्थान, हिमाचल प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण ० ते ६ वयोगटातील प्रमाणाची आकडेवारी स्त्री जन्म नाकारणारी आहे असे दिसून येते.

| **राज्य** | **जनगणना वर्ष** | | | |
|---|---|---|---|---|
| | **१९८१** | **१९९१** | **२००१** | **२०११** |
| हिमाचल प्रदेश | ९७१ | ९५१ | ८९७ | ९०६ |
| हरियाणा | ९०२ | ८७९ | ८२० | ८३० |
| पंजाब | ९०८ | ८७५ | ७९३ | ८४६ |
| राजस्थान | ९५४ | ९१६ | ९०९ | ८८३ |
| गुजरात | ९४७ | ९२८ | ८७८ | ८८६ |
| महाराष्ट्र | ९५३ | ९४५ | ९१७ | ८८३ |

महाराष्ट्राची लोकसंख्या नियोजन व विकास - जन. श. आपटे

महाराष्ट्राचा विचार करता १९९१ मध्ये दर हजारी स्त्रियांचे प्रमाण ९४६ , २००१ मध्ये ९१३ तर २०११ मध्ये ते ९२४ इतके झालेले दिसून आले. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारधारा असणारे राज्य परिवर्तन व विकासाची परंपरा राखणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव केला जातो. परंतू याच महाराष्ट्राने स्त्री भ्रूणहत्येसारख्या महाभयंकर कृत्यात

सहभागी होऊन स्त्री पुरूष असमतोल करण्यास हातभार लावला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हावार, स्त्री संख्येचा विचार केला तर ८०० ते ८५० इतकी संख्या असणा-या जिल्ह्यामध्ये बीड ८०१, जळगांव ८२९, अहमदनगर ८२९, बुलढाणा ८४२, कोल्हापूर ८४५, जालना ८४७, औरंगाबाद ८४८ या जिल्ह्यात असे प्रमाण दिसून येते.

महाराष्ट्रातील मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश यांच्या तुलनेत आदिवसी बहुल व मागास समजल्या जाणा-या विदर्भात मात्र स्त्री जन्मदर चांगला दिसतो.

**लिंग गुणोत्तरातील असमतोल प्रमाणाचे समाजावरील दुष्परिणाम :**

समाजातील सर्वात असुरक्षित घटक म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. प्राचीन काळी स्त्री सुरक्षित होती. सबल आणि सक्षम होती. एवढेच नव्हे तर ती स्वयंपूर्ण होती. परंतु काळाच्या ओघात तिचे हे स्वरूप बदलून ती दुर्बल झाली. समाजाकडून तिच्यावर अन्याय, अत्याचार झाले. भारतात दर मिनीटाला स्त्रियांवर अत्याचार होतात, महिला विरोधी गुन्हेगारीत वाढ झालेली आहे व त्यासोबतच आता स्त्रिचा जन्मदर ही कमी होतो आहे. अलीकडच्या काळातील आकडेवारी पाहिली तर त्याचे गांभीर्य लक्षात येईल. विकसित देशात व पाश्चात्य राष्ट्रात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या ८.५ टक्क्याने अधिक आहे.

लिंग गुणोत्तरातील असमतोलपणा कमी झाला नाही. तर समाजात त्याचे विषम परिणाम पहावयास मिळतील. आजही काही समाजात विवाह योग्य मुलांना मुली मिळत नाहीत. अविवाहीत मुलांच्या संख्येत वाढ होत आहे. असंतुलित लिंगानुपातामुळे भविष्यात बहुपतित्वाची प्रथा रूढ होईल आदिम जातीप्रमाणे सेवा विवाह किंवा अपहरण विवाहासारख्या पध्दती विकसित होतील. एड्स किंवा तत्सम आजारांचे प्रमाण वाढेल, वेश्यावृत्ती सारख्या सामाजिक समस्येला चालना मिळेल. बलात्काराच्या प्रमाणात वाढ होईल. वधु मुल्याची संकल्पना अधिक रूजेल स्त्रियांची संख्या कमी आल्यामुळे तिच्या सुरक्षीततेत वाढ होईल व तिच्यावरील बंधनात वाढ होईल, स्त्रिच्या स्वातंत्र्यावर गदा येईल. अशा अनेक समस्या समाजात निर्माण होतील. शिवाय समाजातून मुलींची संख्याच कमी झाली तर समाजाचे अस्तित्वही संपुष्टात येईल. समाज व्यवस्था नाहीशी होईल. म्हणून समाजाने व देशाने कमी होणा-या स्त्रियांच्या प्रमाणाचा गांभीर्याने विचार करून त्या संबंधी पावले उचलणे गरजेचे आहे. कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तरच स्त्री - पुरूष प्रमाणात समानता येऊन सामाजिक वातावरण चांगले होईल.

**लिंगगुणोत्तर समतोल राखण्यासाठी उपाययोजना :**

स्त्री लिंगदर कमी होण्यामागे जी कारणे सांगितली जातात. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि सांस्कृतिक ही प्रमुख कारणे मानली जातात. पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रीकडे बघण्याचा पुरूषी दृष्टीकोण आणि त्यामुळे स्त्रियांना कुटुंबात मिळणारी वागणूक , मुलगी परक्याचे धन त्यामुळे तिचे ओझे वाटणे. हुंडा प्रथेमुळे मुलीचा जन्म नाकारणे, मुलगा वंशाचा दिवा, वंश कायम करणारा त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा जास्त स्त्रियांवर होणारे अत्याचार यामुळे तिच्या सुरक्षेची काळजी अशा अनेक कारणांमुळे स्त्रिचा जन्म नाकारला जातो.

थोडक्यात सर्वच स्तरातील मानसिकता, शासकिय, राजकिय धोरणे बदलल्या शिवाय स्त्रीचे अस्तीत्व लक्षात येणार नाही. स्त्रिचे अस्तित्व स्विकारणे, स्त्रिचा सन्मान करणे व विकासासाठी तिचे योगदान घेणे ही आजच्या समाजाची, काळाची गरज आहे.

वरील सर्व बाबी करावयाच्या असतील तर सामाजिक स्तरावर प्रथम स्त्रियांना सुरक्षितता उपलब्ध करून देणे. कुटुंब स्तरावरील तिचा दर्जा बदलून निर्णय प्रक्रिया, श्रमविभागणी, लिंगधारीत भूमिकामधील तफावत कमी करणे, सत्ता भूमिकेत सहभाग वाढवणे हुंड्यासारखा अनिष्ठ प्रथांना निर्बंध घालणे, सांस्कृतिक परंपरामधील लिंगधारीत भेदभाव कमी करून स्त्री - पुरूषांना समान पध्दतीने सहभागी करून घेणे. अधिक मुली असणा-या पालकांचा सन्मान

करणे. मुलींचे शिक्षण मोफत करणे, त्यांना शिष्यवृत्त्या व प्रोत्साहनपर भत्ता देणे, खाजगी सोनोग्राफी केंद्रावर बंदी आणने, स्त्री भ्रूण हत्या करण्यामध्ये सहभागी असलेल्या डॉक्टरला व पालकांनाही कठोर शिक्षा द्यावी. शासनाने मुलींच्या जन्माचे स्वागत करणारे कार्यक्रम राबवावेत. समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृतीपर उपक्रम करावेत. मुलींच्या जन्मासाठी आर्थिक, अनुदानासोबत आरोग्य, शिक्षण, नोकरी इत्यादी क्षेत्रातही सुरक्षितता उपलब्ध करून द्यावी.

तात्पर्य मुलींना सामाजिक, राजकिय, आर्थिक स्तरावरील सुरक्षितता सन्मान प्रदान करू शकते. अशी सुरक्षितता मुलींच्या लिंगदरातील तफावत कमी करण्यास आणि समाज स्वास्थ्य व सातत्य टिकवून ठेवण्यास हातभार लावू शकते. म्हणून मुलींच्या जन्माचे स्वागत करा. स्त्री भ्रूण हत्याचा त्याग करा. स्त्रियांना स्वयंपूर्ण सबल आणि सक्षम होण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करा. यातच समाजाचा विकास आहे, मोठेपणा आहे.

**संदर्भ सूची**

१) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मानव विकास अहवाल - २०१२
२) महाराष्ट्र शासन लोकराज्य २०११
३) ज.श. आपटे, महाराष्ट्राची लोकसंख्या नियोजन व विकास
४) Declining girl’s ratio & society ( National Seminar Manavlok College of Social Sciences, Ambajogai, Beed, 2014 )